माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ/ १४४/२०२२/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री.राम खाडे | सहशिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१ | शिक्षण उपसंचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१ |

## तक्रार सुनावणी दिनांक -दि.२९/११/२०२३

तक्रारदार यांनी दि. १०/०६/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक २६७/२०२१/पुणे मध्ये सुनावणी घेऊन दि. २९/०३/२०२२ रोजी आदेश पारित केला. त्यामध्ये आयोगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे यांनी विहित मुदतीत माहिती न देऊन कलम ७(१) चा भंग केला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम २० नुसार कार्यवाही कर करण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन अंतीम कार्यवाही करण्यात येईल. सदर आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी केली नाही, अशी तक्रार तक्रारदार यांनी केली."

त्यानुसार दि. २९/११/२०२३ रोजी सुनावणी आयोजित सुनावणीस तक्रारदार, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय गैरहजर होते.

जन माहिती अधिकारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी पुन्हा एक संधी देण्यात येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१. सहशिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे -०१ यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाच्या आदेशावर आजपर्यंत काय कार्यवाही केली, त्याबाबतचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सादर करावा. विहित मुदतीत खुलासा प्राप्त न झाल्यास आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन पुढील योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यांत येईल.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार क्रमांक -१४४/२०२२/पुणे/ 5066/2023 दिनांक 12/12/23